# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११०२८/२१/अ.क्र.५८२२/२४**

श्री.ज्ञानेश्वर सुभाष माटे

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ. व का.) स्पेशल सेल
बृ.मुं.म.पा. दुय्यम अभियंता (इ.व का.) स्पेशल सेल यांचे कार्यालय,
महापालिका प्रशिक्षण केंद्र, रहेजा कॉम्प्लेक्स, चांदिवली फार्म रोड,
पवई, मुंबई-४०० ०७२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) स्पेशल सेल
बृ.मुं.म.पा. दुय्यम अभियंता (इ.व का.) स्पेशल सेल यांचे कार्यालय,
महापालिका प्रशिक्षण केंद्र, रहेजा कॉम्प्लेक्स, चांदिवली फार्म रोड,
पवई, मुंबई-४०० ०७२.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७-११-२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित. ट्रॅक रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.०४.११.२०२४ रोजी प्राप्त.
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६-०७-२०२० | ०९-०९-२०२० | २८-१०-२०२० | २१-१२-२०२० |

अपिलकर्तांनी दि.०९-०९-२०२० रोजीचे जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व प्रथम अपिलीय अधिकारींचे दि.२१-१२-२०२० रोजीचे आदेश संलग्न केले आहेत.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.१६-०७-२०२० अन्वये मे.इन्स्टिटयूट फॉर डिझाईन ऑफ इलेक्ट्रिकल मेसेजिंग इन्स्ट्रयुमेंटस् ची माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ. प्र.) पू.द. विभाग यांनी दि.११-०८-२०२० व ०९-०९-२०२० च्या पत्रान्वये अपिलकर्तास उत्तर कळविले.

जन माहिती अधिकारांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलकर्तांनी दि.२८-१०-२०२० रोजी प्रथम अपिल अर्ज केला.

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११०२८/२१/अ.क्र.५८२२/२४**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) वि.क. यांनी दि.२१-१२-२०२० रोजी जन माहिती अधिकारींनी पुर्नअभिलेख तपासून ले आऊटला मान्यता दिली आहे किंवा कसे पडताळणी करुन अपिलकर्तास कळविण्याचे आदेश दिले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.०९-०३-२०२१ रोजी पूर्ण माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता आणि प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.प्र.) वि.क. उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.प्र.) वि.क. यांनी दिनांक ३०-१२-२०२० चे पत्र आयोगास सादर केले की, त्यांनी अपिलकर्तास अभिलेखामध्ये उपलब्ध माहिती पुरविली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
7-11-2024

State Information Commission Maharashtra

मुंबई
दिनांक : ०७-११-२०२४

( डॉ.प्रदीप व्यास )
राज्य मुख्य माहिती आयुक्त